# शिवराज



शिवराज महाविद्यालय

गडहिंग्लज

१९८२.



कर्मवीर कै. विठ्ठल रामजी शिंदे

संस्थापक-अध्यक्ष



खासदार बाळासाहेब माने

# 'शिवराज'

## वार्षिक नियतकालिक – १९८२



नयनांतुनि स्त्रवतें नितळ चांदणें मंद,
पापणीवर तोलला मेघ कां कुंद ?
या मावटांतुनी समीर अलगद येतां
अधरांतुनी झरतें अक्षय सुख स्वच्छंद !

# ‘ संपादकीय ’

महाविद्यालयाचे चांगले वार्षिक काढणे ही एक सुखद घटना खरी; पण त्यामागे वेदना आहेत ! यावर्षी 'शिवराज'चा अंक देखणा आणि वेळेवर निघत आहे म्हणून आम्हास समाधान वाटते. कॉलेजचे प्राचार्य बलवंत देशमुख यांच्या प्रेरणा, योग्य सूचना आणि मार्गदर्शन आम्हास नेहमीप्रमाणे लाभले खरं तर या कामात रंग भरले ते प्रा. सौ. मधुमालती कोटीभास्कर, प्रा. सौ. सुहासिनी जगताप, प्रा. गजानन गुळवणी व प्रा. वि. मा. सुरंगे यानी.

आपले मोलाचे "शद्ब" शिवराजच्या तरुण साहित्यिकांनी मांडलेल्या स्वच्छ स्वरूपात माझ्याकडे दिले याबद्दल त्याना धन्यवाद. पंख फुटलेल्या कविता, तर्कशुद्ध वैचारिक निबंध, वाचकांच्या काळजांवर डंख मारणाऱ्या कथा व वाहत्या शैलीत लिहिलेले लघु–निबंध हे या अंकाचे वैशिष्ठय आहे. मैदानावर विविध खेळातून व्यक्त झालेली खेळाडूंची 'रग', सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहसंमेलनातून दिसलेले रंग, शब्दांचे तरंग, अभिनयाचे अविष्कार व कॉलेजचे बुद्धि–वैभव हे सारे या अंकात चित्रित केले आहेत.

आमचे मुद्रक प्रा. चंद्रहास धुमाळ यानी आपले सारे कलावैभव, कष्ट व कौशल्य या अंकात ओतल्याचे आपल्या प्रत्ययास येईलच. त्यांच्या ‘ झुंजार प्रिंटिंग प्रेस ’ निपाणीमधील कामगारानी अंक सजवायला व आम्हाला तो वेळेत द्यायला खास परिश्रम घेतले आहेत. महाविद्यालयाच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी या कामात खूप सहकार्य दिले आहे

जाहिराती मिळवणे सोपे नाही ! जाहिरात विभागाचे काम प्रा. गवसणे व प्रा. खिचडी यानी अत्यंत जबाबदारीने पार पाडले. रुपयाची किंमत कितीही कमी झाली असली, तरी तो दान करणाऱ्या माणसांचा दुष्काळ आहे अशा अवस्थेतसुद्धा, जाहीरातदारांनी आपल्याला समाजाकडून मिळालेल्या धनाचा अल्पांश कॉलेजसारख्या सामाजिक संस्थेला जाहिरातीच्या स्वरूपात प्रदान केला. त्याबद्दल त्याना धन्यवाद ! हा "शिवराज"चा अंक हे सर्वांच्या कष्टाचे शब्दशिल्प ते आपल्या हाती सोपवताना आम्हास धन्यता वाटते. आपण ते गोड मानून घ्याल एवढीच अपेक्षा.

संपादक

**प्रा. किसन केसरकर**

# 'हृद्गत'

आभाळातून अमृतधारा बरसू लागतात. सूर्यकिरणानाही अगदी सचैल स्नान घडू लागते. मृद्गंध साऱ्या आसमंताला, गंधगीतांनी धुंद करीत असतो, ओढे ओढाळ मस्तीत धावत असतात आणि हिरण्यकेशीला आनंदाच्या उकळ्या फुटत असतात. ती तृप्तीत सागराकडे सुसाटपणे जावू लागते. हिरव्या, लुसलुसत्या गवताने पायघड्या अंथरलेल्या असतात नि आमच्या महाविद्यालयीन नव वर्षाची तुतारी वाजू लागते. ढगांचे ढोल गर्जत असतात नि सरींचा ताशा सारखा वाजतच असतो. मेघमाला मस्तकावर मिरवीत नि जलधारा पावलांनी खेळवीतच 'शिवराज'चे नववर्ष उमलत येते.

'शिवराज'चे हे वर्षतर मूर्तिमंत आनंद घेऊन आले, सुख लेवून आले, तृप्ती पिवून आले, कर्तव्यपूर्तीचे दान दोन्ही हातांत भरभरून आले. सतरा वर्षे संपून गेली तरी 'शिवराज' एम. आर. हायस्कूलमध्येच भरत होते. पण या संवत्सराने मात्र शिवराजच्या मस्तकावर कृपेची सावली धरली. पाच लाख रुपयांच्या प्रासादतुल्य नूतन अशा वास्तूने शिवराज महाविद्यालयाचे यावर्षी आनंदाने स्वागत केले, ग्रंथालयापासून कार्यालयापर्यंत, विद्यार्थ्यांच्या वर्गापासून प्राध्यापक-कक्ष पर्यंत, क्रीडांगणापासून रंगमंचापर्यंत सर्वकाही एकाच रम्य परिसरात आले. यामुळे विद्यार्थ्यांना कमालीचा आनंद झाला. प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचाऱ्यांना समाधान लाभले. प्रशस्तवास्तू, संपन्न ग्रंथालय व भव्य-क्रीडांगण, रम्य शैक्षणिक वातावरण यांमुळे शिवराजची ही विद्यानगरी म्हणजे गडहिंग्लजचे अनुपमेय भूषण झाले. या सर्वांचीच नगरवासियांनी मुक्तकंठाने स्तुती केली. संस्थेच्या मंडळींनाही कर्तव्यपूर्तीचा आनंद लाभला.

पहिले सत्र झरझर संपू लागले नि आम्ही नवनवीन संकल्प सोडले. गडहिंग्लज म्हणजे महाराष्ट्राचे अगदी दक्षिणचे टोक. पण तरीही यावर्षी आम्ही महाराष्ट्रातील नामवंत वक्त्यांची व्याख्याने घडविण्याचा चंग बांधला. मान्यवर वक्त्यांनी आमच्या स्नेहल निमंत्रणाचा आदर केला. त्यामुळे 'शिवराज'चे हे वर्ष श्रुतिसुभग व्याख्यानांनी संपन्न ठरले. मा. श्री. माधव कोंडविलकर,

पत्रपंडित मा. मुकुंदराव किर्लोस्कर, मा. श्री. व. पु. काळे, मा. श्री. व्यंकटेश माडगूळकर यांसारख्या मराठी भाषेतील समर्थ वक्त्यांनी ललितरम्य व्याख्याने दिली. स्नेहसंमेलनाच्या पारितोषिक वितरण प्रसंगी मा. श्री. द. मा. मिरासदार यांनी दिलेले रसबहार व्याख्यान म्हणजे तर कळसाचेच ठरले. यावर्षी या व्याख्यात्यांनी 'शिवराज'मध्ये जणू रसवंतीचा मळाच निर्माण केला. आमच्या व्यासपीठावर विनोदाचे अवगुंठन लेवून मराठी कथा–सजली–धजली. आमच्या विद्यार्थ्यांबरोबरच गडहिंग्लजमधील व परिसरातील हजारो रसिकांना या वर्षी ही अपूर्व पर्वणीच लाभली. या रसयात्रेने रसिकांचो पंढरी पिकली. या व्याख्यानांचे वेळी शिवराजचे प्रांगण वेळोवेळी रसिक श्रोत्यांनी नुसते फुलून गेले.

शिवराजच्या स्नेहसंमेलनानेही आता उत्तम परंपरा निर्माण केलेली आहे. आमच्या महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन म्हणजे सर्वांचे सामंजस्य व सहकार्य यामुळे तो एक महोत्सवच होत असतो. नाटक, करमणूक, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत सर्वांच्या सहयोगाचे यावर्षी मोठे मनोरम दर्शन घडले. उत्साहाला उधाण आले. विद्यार्थ्यांनी या आनंद मेळयात मनापासून आनंद लुटला.

गेल्या वर्षी आमच्या महाविद्यालयाची सहल उत्तर भारतात गेली होती. तर यावर्षी आमची सहल दक्षिण भारतात गेली. विद्यार्थ्यांनी म्हैसूर–बेंगलोर उटी, रामेश्वर, तिरुपती, कन्याकुमारी इत्यादी स्थळांना भेटी देवून–प्रवासाचा आनंद लुटला, ज्ञानानंद चाखला. या सहलींच्या रूपाने 'शिवराज'ने जणू सगळा भारतच पादाक्रांत केला. येवढया दूर–दूरच्या ठिकाणी सहली गेल्या. यात आमच्या प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सहयोगाचे सहलीतून सुरेख दर्शन घडविले.

आमच्या महाविद्यालयात सामाजिक जाणिवांचे जागरुकतेने संवर्धन केले जाते. सामाजिक मनातून, सामाजित ऋणातून, सामाजिक भावनांतून 'शिवराज' मोठ्या दमदारपणे पावले टाकीत आहे. गडहिंग्लज परिसरातील अनेक छोटया–मोठ्या गावांना आमच्या सेवाव्रताने आम्ही आमचे कार्य केले आहे. यावर्षी आमच्या महाविद्यालयाच्या प्राध्यापक व कर्मचारी वर्गाने १,३२,००० रु. अल्पबचतीत गुंतविले. कॉलेज समाजिक जाणिवेने विधायक कार्यात राष्ट्र जीवनाशी कसे समरस होवू शकते याचा सुरेख वस्तुपाठच आम्ही घालून दिलेला आहे. 'शिवराज' आता विविध शाखोपशाखांनी वाढत आहे. फुलाफळांनी समृद्ध होत आहे. मा. बा. बाळासाहेब माने यांचे मौलिक मार्गदर्शन व सहकार्य यामुळे आमच्या प्रगतीला वेग आलेला आहे व महाविद्यालयाला सुस्थिरता प्राप्त झालेली आहे. संस्थेचे पदाधिकारी सदस्य यांचा सद्‌भाव स्पृहणीय आहे. प्राध्यापक व कर्मचारी यांची आपुलकीची भावना आहे. विद्यार्थ्यातील सामंजस्य हा तर कॉलेजच्या प्रगतीतील महत्वाचा घटक झालेला आहे. यापुढेही सर्वांच्या सहकार्याने शिवराजची प्रगती गतिमानतेने निश्चितच होईल असे मला मनोमन वाटते.

– प्राचार्य बलवंत देशमुख.

# श्रद्धांजली



"पराधीन आहे जगतीपुत्र मानवाचा"

साहित्य, कला, समाजकारण, राजकारण व इतर क्षेत्रातील खालील महनीय व्यक्तींचे दुःखद निधन झाले, त्याना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

- शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार, पहिले कुलगुरु – **डॉ. आप्पासाहेब पवार**
- संस्थेचे सल्लागार – **आम. पी. बी. साळोखे**
- महान शिक्षण तज्ञ – **जे. पी. नाईक**
- समाजवादी, अष्टपैलू विचारवंत – **प्राचार्य नरहर कुरुंदकर**
- झुंजार स्वातंत्र्य सेनानी – **आचार्य कृपलानी**
- माथाडी कामगार नेते व मराठा महासंघाचे अध्यक्ष – **आम. आण्णासाहेब पाटील**
- सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री – **श्रीमती नर्गीस दत्त**
- थोर संगीत दिग्दर्शक – **सी. रामचंद्र**
- कर्तबगार व अभ्यासू संसदपटू – **खास. रामभाऊ म्हाळगी**
- प्रसिद्ध नाटककार व अभिनेता – **बबन प्रभू**
- मराठी नाटककार – **गो. गं. पारखी**
- श्रेष्ठ उर्दू शायर – **जोश मलीहाबादी**
- श्रेष्ठ उर्दू शायर व गीतकार – **फिराक गोरखपुरी**
- विनोदी हिन्दी चित्रपट अभिनेता – **केश्तो मुखर्जी**
- मराठी विनोदी कथाकार – **शामराव ओक**
- विनोदी ग्रामीण कथाकार – **बा. भ. पाटील**
- हिन्दी चरित्र अभिनेता – **डेव्हिड**
- शिवराज कलिज बी कॉम. भाग १ मधील विद्यार्थी – **सुभाष वाळी**

– संपादक

# शिवराज महाविद्यालय गव्हर्निंग कौन्सिल

| | | |
|---|---|---|
| १) | मा. खासदार बाळासाहेब माने | अध्यक्ष |
| २) | ,, डी. एस. कदम | उपाध्यक्ष |
| ३) | ,, बी. बी. देशमुख | सेक्रेटरी |
| ४) | ,, गणपतराव तथा दादा देसाई | सदस्य |
| ५) | ,, शंकरराव बाबूराव चव्हाण | ,, |
| ६) | ,, वाय. आर. मोहिते | ,, |
| ७) | ,, एन. जी. बटकडली | ,, |
| ८) | ,, व्ही. व्ही. फडणीस | ,, |
| ९) | ,, ॲड. एस. डी. शिंदे | ,, |
| १०) | ,, टी. आर. मोकाशी | ,, |
| ११) | ,, धोंडीराम पताडे | ,, |
| १२) | ,, कृष्णराव पाटील | ,, |
| १३) | ,, एस. टी. जाधव | प्राध्यापक प्रतिनिधी |
| १४) | ,, एन. आर. डुंडगेकर | ,, |
| १५) | ,, जे. ए. सवर्तास | शिक्षकेतर, कर्मचारी प्रतिनिधी |

# आमचा प्राध्यापक वर्ग

**मराठी**

प्राचार्य बी. बी. देशमुख

प्रा. व्ही. एस. बत्रे

प्रा. सौ. एम. एन. कोटीभास्कर

प्रा. व्ही. एम. सुरंगे

**हिंदी**

प्रा. डॉ. एस. जी. गोकाककर

प्रा. सौ. एस. एम. जगताप

**इंग्रजी**

प्रा. एन. आर. दुंडगेकर

प्रा. के. बी. केसरकर

प्रा. जी. जी. गुळवणी

प्रा. एम. व्ही. रॉड्रीक्स

**अर्थशास्त्र**

प्रा. एस. टी. जाधव

प्रा. ए. ए. पोवार

प्रा. कु. एस. सी. फडके

**समाजशास्त्र**

प्रा. व्ही. एन. गजेंद्रगड

प्रा. एस. व्ही. कुराडे

प्रा. कु. एस. एस जोशी

**राज्यशास्त्र**

प्रा. सी. ई. धुमाळ

**मानसशास्त्र**

प्रा. बी. के. सारंग

प्रा. बी. बी. मुळे

**वाणिज्य**

प्रा. सी. एन. गवसणे

प्रा. एन. डी. लिचडी

प्रा. डी. के. दंडगे

प्रा. ए. एस. मुधोळे

प्रा. आर. एन. हरगुडे
प्रा. व्ही. के. पाटील
प्रा. वाय. पी. कोले

**शारिरिक शिक्षण**
प्रा. ए. एस. नाळे
प्रा. एस. एस. सावंत

**आमच्या कार्यालयातील व ग्रंथालयातील कर्मचारी**

**सुपरिटेंडेंट**
जे. ए. सबनीस

**ग्रंथपाल**
टी. ए. पाटील

**अकौंटंट**
बी. एस. मोहिते

**कार्यालयातील कर्मचारी**
व्ही. एम. गवळी
कु. पी. जी. चोथे
बी. डी. रेगडे
वाय. डी. पाटील
एम. एच. देसाई
बी. आय रामपूरे
एस. एस. गवळी
पी. के. जाधव
डी. एम. मोरे
बी. एस. सावंत
ए. जी. कदम
एल. जी. गाडीवड्डु
सी. एल. गोरुले
एस. बी. मुसळे
पी. जी. पोवार
बी. डी. मोरे
एम. ए. कावणेकर

# ' मराठी विभाग '



निसर्गांतल्या आदिशक्ती परी तूं
कशाला तुला मोजकीं धोरणें ?
जिचे शुद्ध अस्तित्व आनंददायी
तिलाही कशाला गुढयातोरणें ? ?

— वसंत बापट

# ' साहित्य संम्मेलन आणि राजकारण '

मौलाली महंमद पठाण
(बी.कॉम. भाग ३)

साहित्य संम्मेलन हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जिवनातील एक आनंद सोहळा आहे. पहिले साहित्य न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या पुढाकाराने पूणे येथे झाले. तेंव्हापासून साहित्यसंम्मेलनाने स्वतःची अशी एक परंपरा निर्माण केली आहे. आप्पासाहेब फडके, वि. स. खांडेकर, आचार्य अत्रे, अनंत काणेकर, तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी इत्यादी श्रेष्ठ साहित्यीकांनी साहित्य संम्मेलनांचे अध्यक्षपद भूषविले व अध्यक्षीय पदावरुन मराठी समाजाला प्रबोधन आणि मार्गदर्शन केले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या साहित्य संम्मेलनाच्या अध्यक्षीय भाषणाच्यावेळी असे उद्‌गार काढले की "लेखन्या मोडा आणि बंदूका हाती घ्या!" तेंव्हापासून मराठी साहित्य संम्मेलन हे प्रेरणेचे व भावनेचे एक उत्साही स्वरुप बनले,

प्रत्येक वर्षी दोन-तीन दिवस साहित्य संम्मेलन भरते व ते गाज जातेले अध्यक्षीय निवडीमुळे वास्तविक पाहाता साहित्य संम्मेलनामध्ये अध्यक्षपदाची निवड होणे हे लोकशाही प्रथेला धरुन आहे. लोकशाही आली म्हणजे संख्याशाही आली व संख्येच्या बळावर कोणीही मुत्सदी मनुष्य अध्यक्ष होऊ शकतो.सर्वांनी श्रेष्ठसाहित्ती कांचा सन्मान अवश्य करावयास हवा. इंग्रजी, फ्रेंच, रशियन साहित्याच्या तुलनेने मराठी साहित्य थिटे पडते. मराठी साहित्तीकही उमदेपणाने निवडणूकी–सारखे प्रसंग टाळू शकत नाहीत.

या वर्षीच प्रा. गाडगीळ विरुद्ध प्रा. कानेटकर असा अध्यक्षीय पदासाठी सरळ-सरळ सामना झाला. त्यात प्रा. गाडगीळांची सरशी झाली. वास्तवीक पाहता प्रा. गंगाधर गाडगीळ व प्रा. वसंत कानेटकर हे दोघे मराठीचे थोर सारस्वत. प्रा. गाडगीळांनी कथा व समीक्षा या माध्यमातून मराठी साहित्याच्या कक्षा रूंदावल्या तर प्रा. वसंत कानेटकरांनी मराठी रंगभूमी आशय संपन्न केली. प्रा. कानेटकरांनी विशेषतः हिमा–लयाची सावली, रायगडला जेंव्हा जाग येते, अश्रुंची झाली फुले, प्रेमा तुझा रंग कसा? इत्यादी नाटकातून

भावनात्मक भूमिका अगदी समर्थपणे सादर केल्या आहेत. अशा साहित्तीकामध्ये एकाचो निवड कशी होते व दुसऱ्याचा पराभव कसा होतो हे आम्ही समजू शकतो. तेव्हा दोन साहित्तीकामधील चुरस टाळता आली पाहीजे.

दुसरी गोष्ट ज्यांनी मराठी साहित्याचा पाया घातला त्या ज्ञानेश्वरांनीसुद्धा 'संस्कृत' विरुद्ध बंड–खोरी करून उपेक्षीतांच्या भाषेत आपला ग्रंथ लिहीला. ज्ञानेश्वर ते विनोबा ही परंपरा चिंतनशील साहित्याचा मानदंड दाखवते. दुसऱ्या बाजूला ग्रामीण कथा, आत्मचरित्र, नवकाव्य, लघुकथा ही माध्यमे मराठी साहित्य समृद्ध करीत आहेत. पण साहित्य संम्मेलनाने याचे पूरेसे दर्शन घडत आहे.

१९७५ च्या इचलकरंजीच्या साहित्य संम्मे–लनाच्या अध्यक्षपदावरून पु. ल. देशपांडे म्हणाले " जे वाटेल तो ते लिहो ! " संत नामदेवा पासून नामदेव ढसाळपर्यंत त्यांनी मराठी साहित्याची वाटचाल स्पष्ट केली. अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य हे त्यांनी जीवनमूल्य मानले आजच्या बदलत्या परिस्थितीत साहित्य संम्मेलन व वाचक यांचे नाते नव्याने तपासावे लागेल. कारण साहित्य संम्मेलनाला आज कुंभमेळ्याचे स्वरूप आले आहे. हैद्राबादच्या साहित्य संम्मेलनात कुसुमाग्रज म्हण-तात. चर्चा व भाषणाच्यावेळी मांडव ओस पाडून सर्व माराठी रसीक मोत्यांच्या बागड्या घेण्य साठी एकच गिल्ला करतात. तेंव्हा सघनता ही साहित्य संम्मेलनाची कसोटी असू नये तर 'रसिकता' ही त्याची कसोटी असावी.

खुद्द ज्ञानेश्वरानी परमत्त्वाचा स्पर्श ही श्रेष्ठ साहित्याची कसोटी मानली आहे तर रसिकांचा आनंद व समाधान ही साहित्य संम्मेलनाची कसोटी आहे. बऱ्याच वेळा साहित्य सम्मेलनातील ठराव व राजकीय ठराव यांच्यात कमालीचे साम्य आढळते. उदा. गेली २५ वर्षे सिमाभाग महाराष्ट्रात घालावा हा ठराव प्रत्येक साहित्य संम्मेलनामध्ये चर्चिला गेला व यावर्षी सुद्धा अशा ठरावाची शासन कितपत दखल घेते याची-ही नोंद घ्यावी. साहित्य संम्मेलनाच्या मर्यादा मराठी जीवनाशी निगडीत असायला हव्यात. साहित्य सम्मेलन हे विचारांच्या देवाणघेवाणीचे केंद्र बनले पाहिजे. मराठी माणसांच्या व्यथा आणि वेदना समजावून घेऊन पाऊल उचललें पाहिजे. मराठी व्यवहाराचे स्वरूप त्यात मांडले जावे.असे आज दृष्टीस पडत नाही.वार्षिक उत्स-वाचे स्वरूप साहित्य सम्मेलनास येत आहे. साहित्याचा बाह्य निकष आज प्रवाही ठरत आहे. परिसंवाद, कथाकथन, कांव्यवाचन हेच कार्यक्रम प्रत्येक ठिकाणी चालतात. परंतु त्यामधून नवसाहित्य लेखनाच्या प्रेरणा निर्माण होत नाहीत. हे फार मोठे अपयश आहे. दलित साहित्य, ग्रामीण कथा, झोपडपट्टीतील आतमचरित्र हे सर्व आजच्या जीवनाचे वास्तव घटक आहेत. परंतु समृद्ध ग्रथांची संख्या मराठीत कमी आहे.

स्वातंत्र्यानंतर व संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर मराठी साहित्य अनेक अंगानी फुलेल असे वाटत होते.ते का बरं फुलल नाही? अजूनही पोस्टमन, हमाल, रिक्षावाला, शिपाई आणी गांवकुसाबाहेरची वस्ती खऱ्या अर्थाने साहित्यास आलेली नाही. तेंव्हा साहित्य संम्मेलनाचा उद्देश वाङमय निर्मितीच्या सकस प्रेरणा निर्माण करणे हाच असावा.

पण राजकीय हस्तक्षेप, राजकीय हालचाली यांनी साहित्य संम्मेलनात वाढतं स्थान पटकावलं आहे. मराठी साहित्य मराठी माणसापासून अलग पडत चालले आहे. तेंव्हा जगातील श्रेष्ठ साहित्याचा विज्ञान युगाचा संदर्भ, जागतीक रंगभूमी यांचा संदर्भ साहित्य संम्मेलनात वाङमयीन दृष्टिकोनातून यावा. कारण टॉलस्टॉय, रोक्सपिअर, सार्त या पाश्चात्य प्रतिभा मराठीत आलीतर मराठी माणसाला बरेच तत्वज्ञान शिकवतील. आजचे मराठी साहित्य करमणूकप्रधान आहे. हेतूविरहीत कथा, स्वप्नरंजीत कादंबऱ्या वाढत आहेत. मराठी नाटकांतून चाळे वाढले आहेत. थोडीसी अवघड व परिणामकारक धक्का देणारी निर्मिती का होत नाही ?

आधुनिक मानसशास्त्रातील याचे गुणदोष आपल्याकडे केंव्हां येणार ? थोडक्यात मराठी जीवन आशय संपन्न करणे हेच साहित्याला आव्हान आहे. जेटयुगात मराठी माणूस, त्यांच्या समस्या व उकल देणारा अजून बनू शकला नाही. बरेच श्रेष्ठ साहित्तीक

साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष होऊ शकले नाहीत या साठी प्रयत्न करायला हवा. शेवटी साहित्य सम्मेलन रसिकांच्या, वाचकांच्या पुण्याईवरच जगले पाहिजे. मंत्री आले म्हणजे त्यांचा द्वेष करण्यात अर्थ नाही. राजकारण जनतेपुढे जाणे व जनतेने राजकारण खेळणे हेच लोकशाहीचे सूत्र आहे. शासनाच्या सहकार्याने मराठी साहित्याचा चेहरा बदलण्याचे कार्य जरुर व्हावे. स्वयंभू साहित्तीक स्वत.च्या प्रतिभेवर जगत असतो मर्जीवर नाही. ! या दृष्टीने शासन साहित्य असा वाद होऊ नये असे माझे मत आहे.

शेवटी कोणत्याही सुसंस्कृत समाजाची इमारत त्यांच्या सुसंस्कृत पायावर उभी असते. रत्नजडीत सिंहासने व संगमरवरी रंगमहाल काळाच्या ओघात नामशेष होतात. पण साहित्याची सिंहासने शास्वत राहतात. इंग्लडच्या किंवा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात शेक्सपिअर, ज्ञानेश्वर व टागोर हीच नांवे नोंदली गेली. कारण ते साहित्याचे हृदयस्पंदन आहे. जोपर्यंत माणस श्वास घेतात, डोळ्यानी पाहू शकतात, कानांनी ऐकतात तोपर्यंत हीच नांवे त्यांच्या कर्णपटलावर येत राहतील. म्हणून शद्बांची सिंहासने निर्माण करणारा कलावंत हा दडपण, प्रलोभन व प्रसिद्धी या मोहापासून दूर असतो. म्हणुनच टॉलस्टाय 'War and Peace' तर खांडेकर 'ययाति' लिहू शकले. ही निर्मिती कोणत्याही सरकारी आदेशाशिवाय झाली आहे. म्हणून जिवनाच्या कक्षा रुंदावणे व जिवनाचे सौंदर्य वाढविणे हे साहित्तीकाचे काम आहे. त्यांची बांधीलकी त्यांच्या कलेशी हवी. अर्थात रायपूर संम्मेलनाचा पेचप्रसंग टळला आहे. ना. टिळक हे रसिक वाचक व प्रेक्षक म्हणून साहित्य संम्मेलनात गेले. महाराष्ट्र व मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री यांनी या वादळापासून दूर राहून सामंजस्य दाखविले. या सामंजस्याची साहित्तिकाकडून अपेक्षा आहे.

●●


शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर

आमच्या उत्पादनावरील विश्वासाचे प्रतिक

बैल छाप

प्रगतशील शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय "मिश्रखते"

चवदार व रुचकर स्वयपांकासाठी निर्भेळ,

मिरची पूड, मसाल्याचे पदार्थ व गोडे तेले

आणि

ॲल्युमिनियम व स्टेनलेस स्टीलची भांडी

वि. शं. शिंदे, नेसरीकर.
कार्यकारी संचालक

बा. गो. देसाई म्हसवे.
अध्यक्ष

# 'वेणी'

काशिनाथ गाडे
(तृतिय वर्ष साहित्य)

घाईघाईंनेच मोटारीतून उतरले आणि घरचा रस्ता चालू लागले. आज सरानी ज्यादा तास घेतल्याने घरी परतण्यास उशीर झाला होत. भूक तर फार लागली होती. अशीच मी रस्ता चालत असताना माझ्या पाठीमागून पावलांचा आवाज येऊ लागला. मी थोडी दचकले आणि तशीच चालू लागले. तसा तो आवाज जास्तच जवळ येऊ लागला. वाटले माझा कोणीतरी पाठलाग करत आहे.

मी मागे वळून पाहीले "फक्त ही एक वेणी घ्या" असे म्हणून एक तरुण माझ्यासमोर हातात वेणी घेऊन उभा राहिला तो दिसायलाही फरसा सुंदर नव्हता पण बरा होता. किती. थकला होता. तो! त्याची ती केविलवाणी स्थिती पाहून मी एक वेणी घेतली. त्याने आनंदाने मला दिली. मी पैसे देवू लागले. तर त्याने घेतले नाहीत. "मला- - मला पैसे नकोत" असे म्हणून तेथून तो दूर गेला.

मला आश्चर्य वाटले त्याच्या ह्या-वागणुकीचे तोच एक व्यवसाय करून तो जीवन जगत असावा. त्याच्याबद्दल विचार करीतच मी घरी गेले.

मी नियमीत कॉलेजला जात होते. तो दररोज मला वेणी देणार पण पैसे घ्यावयचा नाही. मला मात्र फुकट वेणी घेण्यात संकोच वाटू लागला. म्हणून त्याला चुकवून नेहमीच्या वाटेने न येता दुसऱ्याच वाटेने घरी येऊ लागले. परंतू पैसे न घेता मला वेणी देण्यात त्याची काय भावना होती हे मला केव्हाच समजले नाही.

सगळयांच्या जीवनातील आनंदाचा दिवस दीपावळी! दीपावलीच्या शुभप्रसंगी काही नवीन वस्तू खरेदी करण्यासाठी घरा बाहेर पडले, थोडं अंतर चालले असेन इतक्यात समोरून तो येताना दृष्टीस पडला. त्याने मला पाहिले व तो भरभर येऊ लागला आता मात्र मला त्याला चुकविता येणार नव्हते. मी तशीच थांबले.तो नजीक अला.दिनवाण्या नजरेने पहात होता आणि त्याचवेळी त्याने मला नेहमी प्रमाणे वेणी

देवू केली. मी वेणीवरून नजर फीरवली, नेहमीच्या शेवंतीच्या फुलाची आजची वेणी नव्हती तर ती पांढऱ्या शुभ्र मोगरीची आणि फारच सुंदर बनवली होती. मला ती फार आवडली, पण फुकटची वेणी निदान आज तरी मला कांही केल्या नको होती. व मी घेणारही नव्हते म्हणून त्याला मी पैसे देवू लागले तोच.

'ताई' तुम्ही इथून पूढे घेऊ नका. पण आज

या दुर्दैवी माणसाकडून ही वेणी घ्या. तुमच्यासाठीच माळून आणली आहे ताई !

'ताई' हा शब्द ऐकताच मी थोडी बावरले आणि त्याला विचारले.

'अरे, तू मला ताई म्हटलंस'

त्यावर तो म्हणाला

'माझ्यासारख्याने आपणाला ताई म्हटल्या-बद्दल राग आला तुम्हाला?'

मी त्याच्या चेहऱ्यावर नजर टाकली त्याच्या डोळ्यातून अश्रू ओघळले. मीही गहिवरले. त्याला म्हटलं " अरे राग नाही आला – – – पण ऽऽ तुझ्या डोळ्यात ही आसवे कां ?" 'ताई, ऐकाल तुम्ही ती कटू कहाणी ? तुम्हाला बाजारात जायला उशीर होईल"

'होऊ दे उशीर, पण सांग सर्व कांही.'

ऐका तर, आज वर्ष दीड वर्ष झाल असेल त्या गोष्टीला. अगदी तुमच्यासारखीच मला एक बहीण होती. तुमच्या प्रमाणेच तीही शाळेला जात होती माझी एकुलती बहीण असल्याने कांहीतरी करून तिला खूप शिकवावे, तिला गुणी असल्याचे पहावे म्हणून मी धडपडू लागलो पण दैवाचा खेळच निराळा. त्या दैवाने माझ्यावर फार मोठा आघात केला व एके दिवशी माझी बहीण शाळेला गेली ती घरी आलीच नाही. खूप वाट पाहीली शेजाऱ्यांच्या घरी विचारपूस केली. पण कुठेच कांही कळेना म्हणून शेवटी तिच्या मैत्रिणीच्या घरी चौकशी केली पण मैत्रिणीही अजून परत आल्या नव्हत्या तसाच विचार करत शाळेच्या रस्त्याकडे जाऊ लागलो. समोर थोडया अंतरावर खूप माणसे जमलेली दिसली. मी ही काय आहे ते पहावे म्हणून पूढे झालो. मी काय पाहतो हेच मला कळेना माझी बहीण एका ट्रकखाली सापडली होती. केंव्हाच तिचे प्राण निघून गेले होते. ताई, दैवाने माझ्या एकलत्या एक बहिणीला माझ्या पासून हिरावून नेलं,माझं स्वप्न माझ्या, इच्छा आकांक्षा सर्व धुळीला मिळालं. नशिबान आम्हाला आई-बाबांच्या मायेला पारख करुन दुःख दिलं होतंच, पण देवाला हे दुःख कमी वाटलं असणार म्हणूनच त्याने मला ह्या दुःखाच्या खायीत लोटले सांगा, सांगा ताई मी मायेच्या माणसाविना कस जगू? ती अगदी तुमच्या सारखी होती; म्हणून मी तुम्हाला बहीण मानूनच आतापर्यंत वेणी देत आलो, आणि 'ताई' म्हणूनच बहीण मिळाल्याचे माझे मन मला सांगू लागले.

त्याची ही हृदयद्रावक कहाणी ऐकून आणि सांगतेवेळची केविलवाणी स्थिती पाहुन माझ्याही डोळ्यांतून आपोआपच अश्रू ओघळले.

तो पुढे म्हणाला.

'ताई' मी तुम्हालाच बहीण मानतो, मला भाऊ म्हणून ओवाळा, मला बहिणीचे प्रेम द्या. या दुःखाच्या खाईत तुम्ही तरी एक आशेचा किरण सोडा एवढीच माझी एक इच्छा आहे.

मी त्याला पुढे बोलू न देता घरी घेऊन गेले. त्याला उटणे लावून आंघोळ घातली. पाटावर बसवून ओवाळले ओवाळणी म्हणून त्याने ती सुंदर वेणी दिली आणि तो साश्रू नयनानी आनंदाने हसला. मी ही हसले कारण मला आणखी एक भाऊ मिळाल्याचा आनंद झाला. रेडिओतून गाणे सुरू होते.

ओवाळिते मी लाडक्या भाऊराया
वेड्या बहिणीची वेडी ही माया !

○○

# ‘ विळखा ’

**राजू बागबान (महागांवकर)**
बी. कॉम. भाग दोन

“ आई ऽऽ ” विसूनं जीवघेणी किंकाळी मारली. झोपेतच तो घामाने भिजला होता. त्याच्या किंकाळीने खोली झाडता–झाडता हातातली केरसुणी टाकून नर्मदाबाई बाहेर धावल्या. आणि झोपेतच सारं पांघरुन अंगातोंडाभोवती गुरफटून घेतलेल्या विसूच्या अंगावरची चादर खसकन् ओढत त्या म्हणाल्या,

“ विश्या, मेल्या एवढा दिवस वर आला तरी पासला पडलास ! उठ बघू ! शिचा, रात्री उशिरापर्यंत विग्लीश सिनेमे पाहत भटकतो आणि असा किचाळतो ! ” एवढ्या ओरडण्यावरही विसू उठला नाही. तशा त्या आणखी ढोशीत त्या म्हणाल्या,

“ कारट्या गेल्या जन्मी काय कुंभकर्ण होतास की काय ? अरे उठ की ! ” तसा विसू तोंडावरची चादर दूर हटवीत झोपाळू आवाजात म्हणाला,

“ आई, काय कटकट लावलीस सकाळी सकाळी ! च्या मारी सुट्टीच्या दिवसात सुद्धा सुखाची झोप लागू देत नाहीस ! ” तशा नर्मदाबाई तणतणल्या,

“ सुट्टीचा दिवस म्हणायला, शाळा असताना दिखील कधी आठाच्या आधी उठला नाहीस ! म्हणतात ना खाण तशी माती ! बाप तसा बेटा ! कुंभार तसा लोटा ! ” बापाचा उद्धार चालू झाला तसा, आता म्हातारी झोपू देणार नाही हे ओळखून अंगाला आळोखे–पिळोखे देत विसु अंथरुणावर उठून बसला. आणि आळोखे देत असताना त्याच्या बनियनवर नजर गेली. अंगावर रक्ताचा ढसरडाग पडला होता. तो भयभीत झाला. ‘ आता या डागावर थेरडीची नजर गेली तर ती भाजून खाईल ’ असं मनातल्या मनात म्हणत डाग लपविण्यासाठी अंगावर चादर घेऊ लागला. तशा नर्मदाबाई म्हणाल्या,

“ आता उठ की ! की आणखी पासलणार आहेस ! अरे आज संकष्टी आंघोळ कर, गणपतीला जाऊन ये ! ” त्यानी त्याच्या अंगावरची चादर खेचली. विसूचा डाग लपविण्याचा प्रयत्न दुबळा ठरला. नर्मदाबाईंची नजर विस्फारली. डोळे मोठे करीत त्या किंचाळल्या.

" विस्या, रक्ताचा डाग कसला रे हा ? की कुठं मारामारी केलीस ?"

" अगं सदा सर्वकाळ अशी अंगावर काय येतेस धसकन्, काल रात्री सिनेमाच्या रांगेत तिकीटाच्या पाळीसाठी मारामारी झाली एकाला असां पिटला असा पिटला की यंव ! रक्ताचा सडा घातला टॉकीच्या आवारात पोलीस आले म्हणून भडवा वाचला नाहीतर खलास केला असता त्याला !" विसूनं हुकमी थाप मारली. तशा नर्मदाबाई म्हणाल्या.

" एकवीस !"

" काय एकवीस ?" विसूनं विचारलं.

" ही थाप एकवीस वेळा मारलीस तूं ! काय भानगडीत आहेस कुणास ठाऊक !" विसू अंथरुणातून बाजूला झाला. त्याची पाठ वळली. तशा त्याच्या पाठीवर असलेला तळहाताच्या पंजासारखा रक्ताचा डाग त्यांनी पाहिला आणि त्या म्हणाल्या,

" विशा खरं सांग बाबा. हा रक्ताचा डाग कसला ? की कुणाचा मुडदा पाडून आलास ?" त्या घाबऱ्या आवाजासरशी विसूच्या हातापायातील त्राण गेलं. पाय लुळे पडताहेत असं वाटलं. ओठांला कोरड पडली. तोंडातून शब्दही फुटेना सुन्न झालेला विसू आपल्याकडे आईकडे पाहतच राहिला. भकास नजरेनं ! तशा दबक्या आवाजात नर्मदाबाई त्याला हलवीत म्हणाल्या,

" बोल की रे बाबा ! ह्या माझ्या फुटक्या कपाळाला काय आणून लावलयस तूं !" विसूच्या डोळ्यासमोर काल रात्रीचा प्रसंग उभा राहिला... .

रोजच्याप्रमाणे विसू आपल्या टोळक्या सोबत फिरायला बाहेर पडला होता एकत्र बांधेगण असूनही आज एक रहस्यमय अबोला त्यांच्यात पसरला होता. नंदचा, विश्राम आणि श्यामू यांच्यासह हॉटेलातल्या नित्याच्या टेबलावर कांही रित बसून किशोरलालची वाट पाहत होते. सर्वजण एका भयानक विचाराने झपाटले होते. नंदयानं आपल्या घड्याळात पाहिलं आणि मान उडवून इशारत दिली. त्यानं हलक्या आवाजात विचारलं,

" विशा, शामू काम व्यवस्थित झालं पाहिजे !" तसा विसू साशंकपणे म्हणाला,

" पण कुणाला कळलं तर ?" तसा नंदचा चिडलेल्या सूरात म्हणाला,

" काही कळत नाही ! आपल्या चौघाजणाखेरीज कुणाला माहिती असणार हाय ?" एवढ्यानंही समाधान न झालेला विसू आणखी शंका घेत म्हणाला,

" पण-पण आपण हे सारं केलं पाहिजे का ? तसा शामू म्हणाला,

" नंदचा विशाला सांग ! बेत एकदा ठरला की ठरला ! त्यात बदल होणार नाही " त्यावेळीच किशोर आत आला होता. उंच, तगडा, रंगेल असा किशोरीलाल आत येताच त्यानं मजेदार शीळ घालीत नंदयाला विचारलं,

" क्यों नंदचा आज अपना वादा निभावोगे ना? सालं दस हजार तर दस हजार, पण ती मिळालीच पाहिजे ! तुला पैसा मिळेल. तिची सगाई होईल ! माझ्याही उरातली आग शांत होईल ....." विसूनं एकदा चिडून, संतापानं किशोरीकडं पाहिलं. त्याचं माथ भडकलं होतं. त्याच्या सख्या बहिणीच्या शिलाची किंमत दहा हजार ठरवली होती. या किशोरीनं ! चैनीसाठी पाण्यासारखा पैसा उधळणारा हा किशोरीलाल विसूच्या बहिणीसाठी—कल्पनेच्या रूपासाठी हा पैसा मोजायला तयार झाला होता. विसू संतापाने त्याच्याकडे पाहत होता. पण किशोरी शांतपणे म्हणाला,

" वादा मंजूर नसेल, छोड देना यार ! आपण काय रंगेल पक्षी ! इथं नाही तिथं जाऊ ! पण बेटा, हा पैसा आहे एवढं मात्र विसरू नकोस ! तिला अशीच जपत बसशील तर .. तू आयुष्यात तिला सुखी करू शकणार नाहीस ! तिच्या आणि सर्वांच्या सुखा—साठी हा आज एक दिवस तू..." विसूचा सारा राग दुबळा ठरला होता. तो लाचार झाला होता. त्याची मान खाली गेली. त्याला लाज—लाज वाटली. शरमेनं जीव नकोसा झाला. पैशासाठी आपण तिला आपल्या

बहिणीला असलं पाप करायला लावायचं ? पण जे ठरलं होतं, ते त्याच्या साऱ्या मागं त्याचे दोस्त होते. साऱ्यांनी एक बेत मनाशी ठरवला होता. विसूनं एकवार सर्वांकडं पाहिलं आणि म्हणाला,

" वादा केल्यानंतर पुरा निभवायची ही पद्धत आहे ! चला ! " आ ण सारेजण बाहेर पडले.

अंधारातच त्यांची वाटचाल चालू झाली. शहराचा भाग संपून नवीन वसाहत आणि पार्कचा परिसर चालू झाला. अंधारात कुणीच कुणाशी बोलत नव्हतं. पलिकडं पार्कमध्ये माणसांची वर्दळ जाणवत होती. ठरल्याप्रमाणं सारा कट जमून आला होता. बऱ्याच दिवसाची त्याची आशा सफल होणार होती. मागून चाललेला विसू मात्र विचारांच्या भणभणणाऱ्या वादळात हेलपटत होता. आपण करतो आहोत ते योग्य की अयोग्य याचा निर्णय त्याला घेता येत नव्हता. तो या क्षणी विचाराच्या अशा एका टोकावर पोहचला होता की, त्याला आता मागे फिरता येत नव्हते. मागं फिरणं हे दुबळंपण ठरलं असतं. त्याला दुबळा म्हणन घ्यायचं नव्हतं. प्रसंगी स्वतःच्या प्राणाचं मोल देऊन कल्पनाचं आपल्या बहिणीचं लग्न करायचं होतं. तिचं रक्षण करणं हे त्याचं कर्तव्य होतं, त्याची जबाबदारी होती .. मागून शाम आणि नंदया येत होते. आणि अचानक हालचाल झाली. नंदयानं अचानक किशोरी–लालवर झडप घातली. आणि तोंड दाबून धरलं. धडपडणारा, वळवळणारा किशोरी गोंधळला होता. काय झालं हे त्याला समजलं नाही. तो भयभयीत होऊन धडपडत होता. पण नदयाची पकड जबरदस्त होती तेवढ्यात शामूनं हातातल्या खंजीराचे दोन–चार सलग वार त्याच्या पोटात खुपसले. किशोरी धडपडला. वारावर वार बसत होते. विस्फारलेल्या डोळ्यांनी विसू किशोरीलालची धडपड पाहत होता. जखमांनी घायाळ झालेला किशोरीलाल मातीत टाचा घाशीत होता. हातात रक्तानं भिजलेला चाकू धरून शामू किशोरीचे खिसे तपासत होता. त्याच्या हाताला नोटाचं बंडल लागताच त्यानं ते विसूच्या हातात खुपसलं.

" विसू ही तुझ्या बहिणीच्या अब्रूची किंमत ! शील शाबूत राखून वसूल केलेली ! घे ते पैसे. सांग तिला झोपडपट्टीतील दरिद्री भावानं तिला दिवाळीची ओवाळणी घातली ! नंदया, विश्राम चला उचला याला ! विसू, तू आता घरी जा ! पण एक शब्दही कुठे उच्चारू नकोस ! " हातात नोटाचं बंडल तसच धरून सुन्न मनानं विसू उभा होता. त्याची पावलं घराकडं वळायला तयार नव्हती. जीवाला जीव देणाऱ्या दरिद्री पण प्रामाणिक दोस्तांच्या या कृतीनं त्याचं मन भरून आलं होतं तो म्हणाला,

" दोस्त, तुमचे हे उपकार मला विसरता यायचं नाहीत. पण–पण मी ही तुमच्याबरोबर फासावर जाईन ! जे व्हायचं ते तुमच्या बरोबरच होऊ द्या माझं ! चला. मी उचलतो याला ! " असे म्हणत किशोरीलालचा रक्ताने भिजलेला मुडदा विसूनं खांद्यावर घेतला आणि त्या अंधारातच तो नदीच्या पात्राच्या दिशेनं चालू लागला.

रात्री बराच उशीर तो एकटाच भटकत होता. खूप उशीरा तो घरी परतला होता. मस्तक विचारानं फुटायची वेळ आली होती. सिगारेट ओढून–ओढून तोंड भगभगत होतं. पोटात भुकेनं डोंब उसळला होता. तशाच अवस्थेत तो घरी परतला होता. तांब्याभर पाणी पिऊन झोपी जाण्याचा प्रयत्न करीत होता. पण झोप येत नव्हती सारखा या कुशीवरून त्या कुशीवर तळमळत होता. त्याच्यासमोर वळवळणारा किशोरी–लाल दिसत होता. चैनीसाठी चटावलेला, लक्षाधीश बापाचा पोर किशोरीलाल ! पैशाच्या मस्तीत वावरणारा, जगाला तुच्छ मानणारा किशोरीलाल ! त्याच्या रक्तात आपले हात रंगलेत ही जाणीव त्याला वारंवार अस्वस्थ करीत होती. हे सारं आपल्या आईला आपण सांगायचं का ? कसं सांगायचं ? तिला काय वाटेल ? एकामागून एक प्रश्न त्याच्यासमोर नाचत होते. दारिद्र्यातही प्रामाणिकपणा, कष्ट न सोडणाऱ्या आईला हे ऐकून काय वाटेल ? ज्या आईनं कष्टाचे डोंगर उपसून, मोलमजुरी करून, कुणाची भांडीघासून, कुणाची लोणची पापड करून आपल्याला शिकवलं, लहानाचं मोठं केलं. तिच्या कष्टाला साथ देत चार

घरी पाणी भरून शाळा शिकलो. खूप स्वप्नं उराशी बाळगली. जबाबदारी शिरावर घेतली पण किशोरीच्या एका शब्दासाठी त्याचा आपण खून केला. जग तील एक पाप आपण नाहीसं केलं. पण आता पुढं काय ? हे सारं आपण कसं समजवायचं ...बहिणीच्या हिता–साठी—सुखासाठी आपण गुन्हेगारीच्या आगीत स्वतःला झोकून दिलं हे तिला कसं पटवायचं ? आपण केलं ते चूक की बरोबर. आपण त्याचा न्याय केला तो योग्य की अयोग्य, रात्रभर नुसता विचार चालला होता. विचार करून–करून तो थकला आणि त्याच ग्लानीत त्याला झोप लागली –

पहाटे–पहाटे त्याला स्वप्न पडलं होतं. त्या स्वप्नात त्याला किशोरीच्या जागी आपण आहोत आणि किशोरी छातीत खंजीर खुपसण्यासाठी येतोय असं स्वप्न पडलं आणि त्यातच तो ओरडत जागा झाला होता—

त्यानं समोर पाहिलं. नर्मदाबाई त्याला गदगदा हलवीत होत्या. एक सारख्या त्या विचारीत होत्या. पण शेवटी त्यानं धीर करून सांगितलं,

" खरं ते सांगतो पण–पण तुझ्या तोंडातून एक शब्दही बाहेर पडला तर गजाननाची शप्पथ आहे." आणि भराभर सांगायला सुरवात केली. विस्फारलेल्या डोळ्यांनी नर्मदाबाई सारं ऐकत राहिल्या. त्यांच्या डोक्यात एकच विचार होता. आपल्या पोरानं खून केलाय !– त्यांच्या मस्तकावर वीज कोसळल्यासारखं वाटलं त्यांना ! त्या मट्कन खाली बसल्या, ढासळल्या. विसू आतल्या आत गुदमरून रडत होता.

पहाटे–पहाटेच पिंपरीला कल्पना कामावर गेली होती. घरांत ती आता दोघंच होती दुपार झाली होती. चूल्ही आज पेटली नव्हती. डोळ्यातून आसवं हरवल्या मुद्रेनं नर्मदाबाई भितीला टेकून बसल्या होत्या. छप्पर तुटल्यासारखं सारं आयुष्य उजाड झालय, असं त्यांना वाटत होतं हताश झालेल्या, हातापायांतील त्राण मालेल्या नर्मदाबाई आणि त्यांच्या समोर विस्फारलेल्या मनाचा विसू बसला होता ! आजपर्यंत सरळपणानं, प्रामाणिकपणानं जगलेल्या कष्टाचे डोंगर उपसून जिद्दीनं जगणाऱ्या नर्मदाबाई–समोर असा पेच आयुष्यात प्रथमच उभा होता. बहिणीचं शील राखण्यासाठी एका पापी माणसाचा बळी घेणाऱ्या पोराला आता फासावर जा म्हणून सांगायचं कसं ? त्याच्यापासून वाचवायचं कसं ? त्यांनी विसूला सांगितले होते.

" विसू, ठाण्यावर जा ! झालेला प्रकार सांग ! पैसे परत कर आणि माफीचा साक्षीदार हो !

विसू परत पेचात सापडला होता.
त्याच्या समोर अंधार पसरला होता.

अंधारानं घेरलेल्या नदीच्या खळखळत्या प्रवाहानं आपलच प्रेत आता हेलकावे खात चाललय असा भास विसूला झाला.

संध्याकाळ झाली.

नेहमी प्रमाणं हॉटेलच्या ठरलेल्या टेबलावर सर्वजण जमले होते. पण कुणीच कुणाशी बोलत नव्हता. कॉफी आणि सिगारेट संपवून सर्वजण बाहेर पडले. गावाबाहेर निवांत जागी येताच नंदयानं विचारले.

" पोलिसांच्या हालचाली चालू झाल्या समजलं ?" सारेजण त्याच्याकडं पाहतच राहिले. विसूच्या पोटात भीतीनं गोळा उठला ! त्याच्या हाता पायाला कापरा सुटला. त्याच्याकडं पाहत नंदयानं विचारलं,

" विसू, घाबरलास की काय ? अरे ऽ खून केला आम्ही आणि तुला घाबरायला काय झालं ?"

" नाही–नाही रे ! मी नाही घाबरलो. पण–पण आईला मी हे सांगितलं !" त्यानं सांगताच सारेजण मनोमन हादरले. शामूनं विचारले,

" काय सांगितलंस तू ?"

" सारं–सारं सांगितलं ! आईच्या डोळ्यांची भीती वाटली. सगळं सांगितलं. ताईच्या अब्रूसाठी

किशोरीचा खून केला... हे पैसे आणले. सारं सांगितलं ! आईला भयंकर वाईट वाटले रे ! आम्हांला कष्टानं, प्रामाणिकपणानं वाढवलं, शिकवलं. तिला सुखाचे चार घास भरवण्याऐवजी मी भयंकर अपराध केला. तिच्या वाट्याला आता कसलं सुख येतयं ! तिनं मला पोलीस ठाण्यावर हजर व्हायला सांगितलं !" विसू धडाधड सांगत सुटला. सारे हादरून त्याच्याकडे पाहतच राहिले. शामू शांत होता. त्यानं एकवार सगळ्यांच्याकडे पाहिले आणि म्हणाला,

"आम्ही गोत्यात आलो ! विशानं बेईमानी केली. दोस्त, विशा तू जगायला लायक नाहीस. तुझ्या बहिणीसाठी त्याचा आम्ही खून केला. आता आम्हा सर्वांना जगायसाठी तुझ्या आईचा आणि तुझा काटा दूर करायला हवा !" म्हणत त्यानं दोराचा फास विसूच्या गळ्यात घातला. तसा विसू भितीने थरथरू लागला. जीवाच्या भीतीनं त्याच्या घशाला कोरड पडली. चारी बाजूनी अंधारून येतयं असं त्याला वाटू लागलं. आता हा फास आवळला जाईल, आपलीही परिस्थिती किशोरीसारखी होईल, आपलंही प्रेत नदीच्या पात्रात कुजेल, सडेल. लांडगे, तरस आणि आणि कावळे–गिधाडं आपल्या प्रेताचे लचके तोडतील. सारं जग गरगरा फिरतयं असं वाटलं. विसूच्या तोंडा–तून शब्दही फुटेना. पण शामूच्या हातातील फासाची दोर विश्रामनं आणि नंदयानं काढून घेतला आणि तो दोर विसूच्या हातात देत नंदया म्हणाला,

"एका चुकीसाठी आपण दुसरी चुक करायला नको ! याला जिवंत सोडू आणि याच्याच हाताने याची आई मरायला लावू, परंतु गुपचूपपणे झालं पाहिजे. म्हणजे आपण सुखरूप असू !" विसू त्यांच्याकडे पहात राहीला. मध्येच शामूनं विचारलं,

"आपण कसे सुखरूप असूं ?"

"हे बघ शामू ! खूनाची माहिती या आपल्या चौघानंतर फक्त त्याच्या आईला माहीत आहे. तिलाच नाहीसी केली की आपल्या मार्गावरील काटा दूर होईल ! आपण सुखरूप राहीलो ! हे बघ विसू, तूं साऱ्यांचा विश्वासघात केला आहेस. सर्वांनाच धोक्यात आणलं आहेस. त्याची सजा तुला भोगायला हवी. तू तुझ्या आईला खलास केलं पाहिजेस. नाहीतर तुला आणि तुझ्या आईलाही खलास करणं आम्हांला भाग पडेल !" विसू पुरा हादरला, आपण कसल्या चक्रात सापडलोय याची कल्पना त्याला आली. इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिती झाली. कुणीतरी कानात तापलेलं शिसं ओततो असं वाटलं. भयभयीत आवाजात तो म्हणाला,

"नंदया, अरे मी माझी आई मारायची... किती भयंकर गोष्ट सांगतायसं तू ?"

"विसू ऽ आपण सर्वांनी जगायला हवं ! तुझ्या बहिणीवर किशोरीनं पापी नजर ठेवली, पैशानं तिला विकत घेण्याचा विचार केवळ बोलून दाखवला एवढ्यासाठी त्याला खलास केला ! पण तू बेईमानी केलीस. ती झाली नसती तर हा प्रसंग आला नसता. तुझ्या अपराधाची सजा तू भोगायला हवीस जा ! उद्या संध्याकाळी म्हातारीची प्रेतयात्रा निघायला हवी. खांदे द्यायला फार तर आम्ही आहोत. जा !"

निर्जीवपणानं, खचलेल्या मनानं विसू अंधारातून चालू लागला. मरणाच्या फासातून सुटूनही आपण एक जीवंत मरण भोगतो आहोत असं विसूला वाटू लागलं. भणभणत्या मनानं, विसू रखडत रखडत घरची वाट तुडवू लागला. त्याची जडशील अंधारात ठेचाळत–ठेचाळत तो रस्त्यावर आला. आता त्याला अंधाराची साथ होती आणि तीच तिला हवीहवीशी वाटू लागली.

रात्रीचे दहा वाजून गेले. आजही घरात चूल पेटली नसेल म्हणून गाडीवर खाऊन विसू घरात आला. त्यानं मनाशी कांही ठरवलं होतं. पण तो शांत होता. आता त्याला अंधारानं खूप धीर दिला होता. त्याला कशाची भीती नव्हती, तमा नव्हती. घरी आला. दारं सताड उघडी ठेवन नर्मदाबाई वाट पहात बसून होत्या. डोळ्यात प्राण आणून त्यांची दृष्टी विसूच्या वाटेवर खिळली होती. एवढ्यात पावले वाजली. विसू घरात आला. त्यानं बसकण मारली.

" काय झालं ? गेला होतास ठाण्यावर ?"

" गेलो असतो तर परत आलो असतो का !" विसून विचारलं.

" झालं ! विशा, घराला काळं फासणार रे बाबा ! राहिलेली अब्रू वेशीवर टांगणार तूं ! अरे ऽ कसल्या माजात असला उर्मटासारखा वागायला लागलास ! एवढं लहानाचं मोठं केलं. प्रामाणिकपणानं, ताठमानेनं दिवस काढले. तिथ हा कसला दिवस दाखविलास तूं !" नर्मदाबाई तणतणत होत्या. मोठ्यानं बोलताही येत नव्हतं. राग आत धुमसत होता. विसू मुकाट्याने बसून राहीला. बोलून-बोलून नर्मदाबाई बसल्या जागीच पेंगू लागल्या. विसूचे डोळे त्यांच्यावर खिळले होते...

ही आपली आई बारा घरचे जेवण आणून चवीरवीनं खाणं देऊन बहीण-भावंडांना तळहाताच्या फोडासारखं जपलं होतं. चांगलं संस्कार घडवून मोठं केलं. शिकवलं पण नशीबच फुटकं. एवढं शिकूनही वशीला नाही म्हणून नोकरी नाही. अर्जं रखडत-रखडत दिवस जात होते. त्यातच या झोपडपट्टीतील पोरांची संगत लागली. जीवाला जीव देणारी पोरं ! वरुन मवाली पण आतल्याआत माणूसकीचा झरा वाहात असणारी ! केवळ कल्पनेला वाईट नजरेनं पाहीलं. पैशाच्या मोबदल्यात तिची शय्या सोबत मागितली एवढ्यासाठी किशोरीलालला खलास करणारी पोरं !... त्यांच्याच नादानं आपले हात रंगले. त्याचं आस्तित्व आपल्या प्रामाणिकपणात धोक्यात आले... पण जिच्यासाठी हे रामायण घडले ती कल्पना आणि आई या दोघांनाही याची जाणीव नव्हती. मग आपण जगण्यासाठी आईचा गळा दाबायचा का ? तिला फासी द्यायची कां ?- पेंगणाऱ्या, नर्मदाबाईना एकटक तो न्याहाळीत होता.

आपण मरणाला भिणारे नाही.
मग हा भ्याडपणा कां ?

आईला ठार मारून जगणं हा कसला पराक्रम ? तिला जगवून ही आपण जिवंत राहू हे सांगता येत नाही ! खिशातला फास त्यानं हाती घेतला. त्यानं एकवार आपल्या आईला पाहिलं. तिच्या पायांना हात लावला. शेवटचं दर्शन त्यानं घेतलं आणि तो दोर त्यानं तुळीला टांगला आणि आपली मान त्यात अडकवली आणि त्यानं झोकून दिले. क्षणभर त्याचं शरीर वळवळलं आणि तो निर्जीवपणे लोंबकळू लागला.

नर्मदाबाई पेंगत होत्या.

देव्हाऱ्यातली मिणमिणती ज्योत अंधाऱ्या खोलीत तेवत होती. तिच्या प्रकाशात गळफास लावून घेतलेल्या विसूची भीषण सावली पसरली होती.


अनेक असहाय्य रोगावर

**होमीओपाथीक चिकित्सा**

संधीवात, अर्धांग, दमा, मिरगी, (फीटस्), संतानप्राप्ती व अनेक मानसिक रोग, यावर होमीओपाथीक चिकित्सा व उपचारपद्धती सर्वश्रेष्ट आहे

**डॉ. संकेश्वरी क्लिनिक**
**आजरा संकेश्वर रोड, गडहिंग्लज,**

हे अशा उपचार पद्धतीचे ह्या भागातील एकमेव उपचार केंद्र आहे.

# ' बाळूमामा '

सुरेश कुराडे
बी. कॉम. भाग तीन

बाळूमामा हा आमचा न्हावी. चांगला पूर्ण पिकलेला, डोक्याचा कापूस झालेला. त्याच्या सलून समोरून जाताना तुम्ही कोणीही पाहू शकता, त्याच्या ऐंशी वर्षाच्या कपाळावर जमलेल्या सुरकुत्या ! त्याच्या कानशिलाच्या बाजूनं लोंबणारं गोरं गोरं मांस; आणि पार खिडकीसारख्या दिसणाऱ्या कानांच्या पाळचा ! एखादी मातीची घागर डबं घालावी तसं बाळूमामाचं डोकं ! बाळूमामा वयानं झाला असला तरी तो कुठही जरासुद्धा वाकलेला नाही. ताठ गोऱ्या माडासारखा तो आपल्या खुर्चीसमोर काम करीत असतो. त्याच्या निळ्या पोपाखामुळं त्याचं म्हातारं सौंदर्य अधिकच खुलून दिसतं. बाळूमामाच्या हातावरचे, पायावरचे आणि छातीवरचे केस पाहिल्यावर असं वाटायला लागत, की हा माणूस पांढऱ्या केसानी बनवलाय्. मी बाळूमामाला एकदा दुकानात लाकडी बाकड्यावर झोपलेला पाहिला. लांबलचक, कापसाच्या पुतळ्या– सारखा मामा आडवा झालेला. मामाला फक्त एकच हाक मारली. मामा बटण दाबल्यासारखा ताडकन् उभा राहिला खुर्चीसमोर अजून त्याच्या अंगात वीज आहे.

बाळूमामाच्या दुकानात केस कापून घेणं, म्हणजे विश्रांती गृहात प्रवेश करणं. स्वच्छ आरसे, सुगंधी साबण, आणि आमचा देवदूतासारखा मामा. बाळूमामा शिकलेला नाही, पण पुण्याच्या भटजीला लाजवेल अशी त्याची देखणी भाषा. तो बोलू लागला की अंगावर बकुळीची फुलं पडताहेत अस वाटतं गिऱ्हायकाला. ऐंशी वर्षानंतरसुद्धा मामाचा आवाज मोडलेला नाही. तुम्ही कोणीही विश्वास ठेवणार नाही माझ्यावर. आहो हा ऐंशी वर्षांचा जीव आठ–आठ तास सतत उभा रहातो. तुमच्या डोक्यावर स्वर्ग वाकावा तसा मामा सुखद केस कापत असतो. त्याची वयस्क बोटं डोक्यावरून मोर पिसासारखी अलगद फिरतात. त्याच्या हातातली कात्री उगाचच सुखद वळवळ करीत फिरत असते. तो बोलतो ते तुमच्या प्रतिबिंबाकडे बघूनच. मामाला उगाच आचकट केलेला विनोद आवडत नाही. त्याचं सर्व गिऱ्हायिक कल्चर्ड आहे.

बाळू मामाच्या आयुष्यातली ऐंशी वर्षे स्वच्छ नाहीत. बाळूमामान आपल्या भावजयचा खून करून १४ वर्षे तुरुंगातली हवा अनुभवली आहे. बाळूमामा हा मूळचा रजपूत राजस्थानातला. खडतर वाळवंट तुडवीत पार महाराष्ट्रापर्यंत येऊन पोहचला. मामा आता पूर्वीचा राहिला नाही. त्याच्यातला गुन्हेगार मावळला आहे. आयुष्याच्या संध्याकाळी मामाचे असे जवळचे कोणी नाही. मामाची इर्षा आहे, श्वास असे-पर्यंत काम करणे आणि स्वतःला सांभाळणे. मामाच्या छोट्या घरात तुम्हाला मांजर, कुत्रा किंवा पालसुद्धा दिसणार नाही. त्याच्या राहत्या घराच्या आतल्या खोलीत एक मृत प्राणी संग्रालय आहे. मामानं घरात मारलेल्या पाली, झुरळ, कोळी आणि मुंगळेसुद्धा वेगवेगळ्या काचेच्या बरणीत भरून ठेवले आहेत. एका मोठ्या कागदावर रंगी-बेरंगी फुलपाखरं पिनानी टोचून भिंतीला चिकटवून ठेवली आहेत. मामाला स्वत.खेरीज घरात कोणी जिवंत असलेल आवडत नाही. या माणसाचा हा छंद मानवाला उपकारकच ठरला आहे. बाळूमामातला भयानक गुन्हेगार मानवेतर प्राणी मारण्यात अडकून पडला आहे.

मला हे सारं समजल्यावर मामाच्या दुकानात जाणं मी बंद केलं. सोमवारचा दिवस होता तो. मामानं मला आपल्या घरी चहाला बोलावलं. भीत भीत मी मामाच्या घरात पाय टाकला. मी पाहिलं. बाळूमामा शेगडीत डोळं खुपसून रडत होता. मला भीती वाटली क्षणभर. मामान चहाचे कप भरले आणि डोळे भरून आपल्या दीर्घ जीवनाची काळी कथा सांगितली. शेगडीत निखारे फुलत होते, घड्याळाचे काटे पुढे सरकत होते आणि मामाची कथा माझा जीव चिरीत पुढ जात होती.

बाळूमामाने आपल्या बदफैली भावजयला भयानक रीतीनं संपवलं होतं. तिला गावाबाहेर नेऊन तिच्या डोक्यावर उकळत डांबर ओतलं होतं. जळलेल्या कागदाची सुरळी व्हावी तशी त्या स्त्रिची भाजलेली त्वचा जळून शरीरावेगळी झाली होती. अर्धवट जळलेल मांस, करपट दिसणार रक्त आणि तो भयानक देह ! सारे ऐकत असता माझ्या अंगाला घाम सुटला. तसे पाहिल्यास बाळूमामा गुन्हेगार नव्हता. पण त्यानं कायदा हातात घेतला. खडक फुटून पाणी यावं तसं बाळूमामाचं वात्सल्य, मुलांवरचं प्रेम उचंबळून वर आलं. बाळूमामानं मला मिठी मारली, आणि म्हातारा ओक्साबोक्षी रडू लागला.

माझी खात्री आहे की मामाच खाजगी जीवन एक मोठी विकृती आहे मी पुन्हा मामाचं आमंत्रण स्विकारलं नाही. मामा दुकानात नाटकातल्या कला-कारासारखं काम करतो. मामा हा सुसंस्कृत, स्वच्छ आणि प्रेमळ असाच न्हावी आहे. हा प्रत्येकाचा समज. तसं पाहिल्यास न्हावी म्हणून तो तसाच आहे. माणूस म्हणून तो राक्षस आहे. अखेर तो दिवस आलाच. मामानं एक दिवस दुकान उघडलं नाही. गावात समजलं बाळूमामानं आत्महत्या केली. मामाचं घर आणि संपत्ती पोलिसांनी ताब्यात घेतली. मामान आपल्या मृत्युपत्रात लिहून ठेवलं होतं –

" माझ्या मृत्यूनंतर माझ्या पापी देहाला कोणी हात लावू नये. कोणी डोळ्यात पाणी आणू नये, किंवा माझा देह माझ्या खोलीतून हालवू नये. यानंतर माझ्या खोलीत निर्माण होणारे किडे, झुरळ आणि पाली याना माझा देह खाऊ द्यावा. माझ्या प्रेताशेजारी किंवा आसपास मेणबत्ती लाऊ नये, किंवा दिवा पेटवू नये. माझे सर्व कपडे, भांडी व पैसा जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कोणाही तीन गुन्हेगाराना वाटून टाकावीत. माझे घर मला माझ्या मृत्युनंतरही ठेवावे. "

# ' डोळे '

- कुमारी सुरेखा कंगुरी
बी. कॉम. भाग तीन

" डोळे दीपस्तंभासारखे असावेत " असे एका कवीने म्हटले आहे. डोळा ही एक चमत्कारिक चीज आहे. काळजावर निखारा ठेवला की त्याची धगधग प्रथम डोळ्यात दिसायला लागते. अर्धी एक मान चिरून सुरी खाली गेली की बकऱ्याचे गरगर फिरणारे डोळे तुम्ही पाहिले नसतील. प्रियकराचे डोळे साले खोबणीत थांबत नाहीत. लागलीच त्याना पंख फुटतात ! डोळे मिटले तरी तुम्ही माणसाचे वय सहज वाचू शकता. डोळा हाच खरा माणसाच्या मनाचा आरसा आहे.

डोळा मारणे ही एक अजब लढाई आहे. कोणी भाला मारला तर जखम एके ठिकाणी होते, पण प्रेमाने मारलेला डोळा माणसाच्या सर्वांगाला घाम आणू शकतो. गालावरच नव्हे तर सर्व शरीरात गुलाबी लाटा उमटत जातात. माणूस पुरता घायाळ होतो. हे आपले प्रेमाचे झाले ! दारू प्यालेल्या माणसाचे डोळे विझलेल्या आगिसारखे असतात. खून करीत असलेल्या माणसाच्या डोळ्यात ठिणग्यांचा कल्लोळ उडालेला असतो. मला माझ्या आयुष्यात दोन गोष्टींचे नेहमी कुतुहल वाटत आलेले आहे; एक म्हणजे पाणी आणि दुसरी गोष्ट म्हणजे डोळा. डोळ्यात पाणी आले की स्वर्ग बुडाला असे समजा. ज्याचे घर जळते त्याचे डोळेही जळत असतात. ज्याच्या जीवनाच्या वाटा मिटल्या आहेत, त्याच्या आणि आंधळ्या माणसाच्या डोळ्यांत काही फरक असणार नाही. लहान मुलांचे डोळ्यात पाणी पाहिले की माझे काळीज विरघळते. धुक्यात हरवलेल्या चांदण्यासारखी मुले मला दिसेनाशी होतात. माणसाने इतके अश्रू सांडले तरी जगायची धडपड थांबलेली नाही.

मेलेल्या माणसाचे डोळेसुद्धा बरेच काही सांगून जातात. मोठे-लठ्ठ बटबटीत डोळे पाहिले की माझ्या मनाला एक मोठाले टेंगूळ येते. झोपलेल्या माणसाचे डोळेसुद्धा तुमच्या मनाच्या खिडक्या सहज उघडू शकतात. सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक वि. स. खांडेकरांचे डोळे शेवटी-शेवटी गेलेच; पण त्याच काळात त्याना जीवनाचे खरे दर्शन झाले. प्रसिद्ध

इंग्लीश महाकवी मिल्टन हा जीवनाच्या मध्यावर आंधळा झाला; पण त्याने आपले महाकाव्य पूर्ण केले. अंधारात त्याचे डोळे प्रकाशाचा शोध घेत गरगर फिरत असत. मानवाने आपल्या जीवनाची उभारणी खऱ्या अर्थाने डोळ्यामुळेच केली आहे. डोळ्याला मराठीत अक्ष असेही म्हणतात. अ पासून क्ष पर्यंतच्या अक्षरानी ज्या वस्तूंचा बोध होतो, त्या सर्वांचे आकलन डोळ्यामुळे होते. शेवटी एकच अक्षर शिल्लक राहते ते म्हणजे ज्ञ. ज्ञान हा माणसाचा तिसरा डोळा मानतात त्यामुळे माणूस दूरवरचे पाहू शकतो. हीसुद्धा एक गंमतच आहे की आपल्या डोळ्यांची दूरवरचे पहाण्याची ताकद संपली की आपल्याला सारे निळे दिसायला लागते. ज्ञान हा एक असा डोळा आहे की त्यामुळे माणसाला निळ्या आकाशापलीकडचे शुभ्र विश्व पहाता येते.

ज्याला डोळे नाहीत त्याला बघता येत नाही. चष्मा लागलेल्या माणसाची मला नेहमी कीव येते. कुबड्या घेऊन धावणाऱ्या पांगळ्या माणसासारखी ही अवस्था ! गॉगल्स घालणारी माणसे चावट असतात. स्वतःचे डोळे लपऊन रंगी-बेरंगी जीवनाचा आस्वाद ही मंडळी डोळेभरून घेत असतात. डोळ्यांच्या विश्वावर लिहिता लिहिता माझी लेखणी बोजड होऊ नये हे मी जाणते. डोळे हे सुद्धा जीवना इतकेच खेळकर व गंभीर असू शकतात. सीतेने रामाच्या वाटेवर लावलेले डोळे. हे रामाच्या बाणाइतकेच लांबपल्ल्याचे होते. माणसाचेच काय, प्राण्यांचे डोळेसुद्धा त्यांच्या जीवनाचा प्रमुख आधार आहेत. मांजराचे डोळे चोर दिव्यासारखे केव्हाही उंदरावर प्रकाश पाडू शकतात. गरूडाला आपल्या भक्ष्यावर विजेसारखे कोसळता येते, ते केवळ त्याच्या डोळ्यामुळेच. आम्हा सर्वांना डोळे आहेत म्हणून आमच्या जीवनाला वाटा आहेत, विविध छटा आहेत. नसतील डोळे तर सारा अंधारच !

जे जे सुंदर आहे ते माणसाने डोळे भरून पहावे. सुर्योदयाची लाली, हिरव्या कच्च गवताचा रंग, हळद सांडलेली तिळाची फुले, प्रकाशाचा सुगंध झालेली मोगऱ्याची फुले, क्षणाक्षणाला बदलणारे पाण्याचे रंग माणसाने डोळ्यात साठऊन ठेवावेत

प्रसिद्ध कवी टागोरानी "सुभा" नावाची एका मुक्या मुलीवर कथा लिहिली आहे. सुभा मुकी असली तरी तिची जीभ तिच्या डोळ्यातून बोलत असे. तिला हवे तेव्हा ती आपल्या डोळ्यात शीतल चांदणे पाडी; केव्हा केव्हा वीज कडाडून तिच्या मनातला संताप तिच्या डोळ्यातून तळपत जाई. असे आपल्याही जीवनात घडते.

पिचपिचीत मेलेल्या डोळ्याची माणसे आपल्याला आवडत नाहीत. डोळे दीपस्तंभासारखे फेकावे लागतात जीवनाच्या समुद्रावर. गवतांच्या पानात, फुलांच्या पाकळ्यात आणि पिवळ्या मधात झाकलेले सौंदर्य वेचावे लागते आपल्या डोळ्यांनी. एवढ्या सुंदर जीवनात डोळे झाकून चालणारा माणूस वेंधळाच असला पाहिजे. डोळे आगीत फेकावे लागतात, त्याना पाण्यात भिजवावे लागते, वाऱ्यावर तरंगत ठेवावे लागते, तेव्हा सापडते जीवनातले निखळ सौंदर्य ! डोळे मिटून चालणाऱ्याला वाट कशी दिसणार ? संध्याकाळी समुद्रात सांडलेले कुंकू, क्षितिजावर ताल धरणारा गुलाबी रंग, आणि माथ्यावर पसरलेले निळे आकाश डोळे झाकून चालणाऱ्या माणसाला कसे दिसणार ?

आंधळ्या माणसाला सारे जीवन ही एक लांबलचक कंटाळवाणी रात्र वाटत असली पाहिजे. काळे गुलाब, काळा सूर्यास्त, काळे इंद्रधनुष्य, आणि काळे आकाश असेच काही त्याला दिसत असले पाहिजे. मी पाहिले आहे आंधळी माणसेसुद्धा जीवनात रस घेतात; पण डोळे असून वाट न सापडणारे महाभाग कमी नाहीत सुंदर स्त्रियांचे निळे डोळे, काळे पाणीदार डोळे, राखी रंगाचे चाणाक्ष डोळे, मोठ्या आकाराचे भोळे डोळे- हा सारा मानवी जीवनाचा खजिना आहे. सायक्लॉपला एकच डोळा, माणसाला दोन डोळे तर शंकराला तीन डोळे ! मला डोळ्याबद्दल जबरदस्त आकर्षण आहे; म्हणून मी म्हणते. "डोळे सर्वांना देगा देवा, खडी-साखरेचा ठेवा !"

★ ★

# ' क वि ता '



## वाट

कोवळ्या उन्हात न्हालेले
हिरवा साज ल्यालेली
ही वाट एकटीच
दूर दूर चाललेली...

वाटेवरची गर्द झाडे
या वाटेवर सावली धरतात
तिच्या बरोबर चालत राहून
या वाटेची सोबत करतात.

मुसाफिराच्या जन्मापासून
त्याचे चालणे असेपर्यंत
हीच वाट इमानाने
सोबत करते स्मशानापर्यंत

**आर. जी. शिंदे**
(बी. कॉम. भाग २)

●●

## तुझ्याविना

तुझ्या अशा पाहण्याचा
अर्थ मजला उमजत नाही.

थोडे कळून तुला
गुलाब द्याया आलो नाही.
लाल गुलाब माझा
तुझ्या रागापुढे आरक्त नाही.
तरी माझ्या कळ्यांचे
तुझ्याविना फुलणे कसे नाही ?

**सुरेश कुराडे**
(बी. ए. भाग ३)

## पाहणे किती वाट

हे सूर्या
एक कळी
अवघडलीय वेलीवर
केव्हापासून
उमलायचंय तिला
तुझ्या पहाटल्या किरणातून
प्रभा तुझी देशील का ?

हे सागरा
एक नौका ताटकळतेय
किनाऱ्यावर
केव्हापासून
तरंगायचय तिला
तुझ्या विशाल अंत:करणावर
प्रवाह तुझा देशील का ?

हे वृक्षा
एक पक्षी
चीत्कारतोय उन्हात
केव्हापासून
बांधायचय घरटं त्याला
तुझ्या निष्पर्ण फांदीवर
सावली तुझी देशील का ?

**मगदूम एम. बी.**
(बी. कॉम. भाग ३)

## घायाळ

हसऱ्या गालाच्या खळीत फुलते प्रेमाची पाकळी
नजरांच्या भेटी जुळवती मनांची साखळी

आठवणीचे वादळ उठते मनाच्या सागरी
कल्पनांच्या लाटा धडकती हृदय किनारी
धडकनेचा काहूर उठतो आसुसलेल्या अंतरी
धावत असते मन तेव्हा वाट काटेरी तरी.

यौवनाचा सुगंध असतो जीवनाच्या फुलात
तहानलेली दोन मने आकर्षिली जातात
आयुष्याला विसरतात प्रेमाच्या खेळात
आनंदाची चंगळ होते काही वेडी होतात.

काळाच्या हादऱ्याने प्रेमास जेव्हा भेगा पडतात
जगणे नको मरण बरे अशा वेदना होतात
प्रेमयुद्धात बहुतेक सारे घायाळच होतात
मग केवळ जगण्यासाठी आठवणीच उरतात

**चौगुल के. एस.**
(बी. ए. भाग १)

★ ★

## वाटचाल

दुःखाचा हात धरून
यशाची वाट चालू पहात होते
खूप दूर चालत राहिले
नाजूक स्वप्नाळू पायांना
काहीतरी बोचत होते
पाय ओले ओले झालेले
ओल्या दवाचा विचार नाकारून
मातीत गुंतू पाहणाऱ्या पायांना घेऊन
पुढे पुढे चालत होते
सहज पायातील दव पाहिले
पाय खूपच रक्ताळले होते.

**कु. सावित्री साळोखे**
(बी. ए. भाग २)



## स्वप्नभंग

स्वप्नं सुफल व्हायची तर
ती कुणालाही सांगायची नसतात
मनोभूमीत रुजलेल्या स्वप्नांकुरांचे
कोवळे अर्थ लावायचे असतात.

आपले आपण मनोमन
जपायचे असतात दुर्वांकुर जनावरापासून
तशी स्वप्नं सांगायची नसतात
आशेच्या कोवळ्या गर्भाला
माणसं नखं लावतात.

रोजच आपल्या समोरच्या वाटेवरून
मांजराहून माणसंच फार आडवी जातात
दुसऱ्यांच्या स्वप्नाचं मोडलेलं
घायाळ कबूतर तोंडात धरून !

**संजयकुमार उत्तुरे**
(बी. कॉम. भाग ३)

## दान

(ना. धों. महानोरांची क्षमा मागून)

हृया न्हाव्यांनी हृया मुलांना दान द्यावे
आणि अशा मुलांनी भरपूर केस वाढवावे
कोणती अशी संधी येई मुलांना
की केस वाढवून त्यांनी गावात फिरावे !

हृया न्हाव्यांनी हृया मुलांना दान द्यावे
आणि ते आईबापांनी हिरावून घ्यावे
कोणती अशी पापे येती फळाला
की वाढलेले केस त्यांचे कापले जावे !!

हर्ष नाईक (११ वी कॉमर्स)

● ●

## तुझ्यासाठी

तुझ्यासाठी
चाफा कसा हळूच फुलतोय
विसरून आपले भान सारे
गंध घेऊन तुला येतोय.

तुझ्यासाठी
शब्द कसा निःशब्द होतोय
डोळ्याआडच्या वर्णामधून
तरी गुपित सांगून जातोय.

तुझ्यासाठी
चंद्र रुपेरी प्रकाश होतोय
कोमेजू नयेस त्यानेही म्हणून
तुला हृदयात साठवून घेतोय.

तुझ्यासाठी
आयुष्य रक्ताळले मी जगतोय
माझीच सुरी माझेच काळीज
तुझ्यासाठी चिरीत जातोय.

सुभाष शेळके
(बी. ए. भाग २)



## साथ

जीवनाची वाट चालीत
आज मी अशी एकटी आले
राजस्थानच्या सहाऱ्यातून
सहारा न घेता तशीच आले.

गाळीत घाम कडक उन्हात
पाऊल पुढे ठेवीत आले
पाय पोळून फोड आले
तरी न मी कधी थांबले.

वादळवाऱ्यांनी वाळवंटातल्या
घेरलं होतं कितीदा मला
आयुष्याचा होईल शेवट
वाटलं होतं तेव्हा मला.

कितीक खोटी मोहून टाकणारी
दिसली ओअॅसिस मृगजळाची
गोड बोलून अजमावून पाहिली
ताकत माझ्या कुणी निष्ठेची.

दाद न देता चालत राहिले
वेड्यासमान एकटल्ली
